International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 November – December 2022

# गोवामुक्ती आंदोलनातील महाराष्ट्र

डॉ. भरतभूषण शमशोन माळी
*क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज वाळवा, जिल्हा सांगली*
***Corresponding Author - डॉ. भरतभूषण शमशोन माळी***
**DOI - 10.5281/zenodo.15210422**

लोकशाहीवादी आंदोलनाच्या भूमिका या त्या-त्या व्यवस्थेच्या भूमिकांचा एक अविष्कार असतो. हा अविष्कार हा केवळ एखाद्या घटनांचे पडसाद असतात असे नाही तर कैक वर्षे एखाद्या विचारांचा परिपाक हा त्या व्यवस्थेच्या भूमिका मांडत असते. भूमिका या कोणत्याही व्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे आणि तो महत्वाचा भाग मांडणे हे आपल्या सामाजिक जीवनाचे महत्वाचे अंग असते. भारतीय व्यवस्थेची मांडणी करताना परंपरावाद किंवा त्या अनुशंघाने येणाऱ्या घटकांशी जोडला गेला. त्याचा परिणाम इतिहास मांडणीवर झाला.

विसाव्या शतकातील भारतात अनेक मोठया घडामोडी झाल्या होती त्यातील गोवामुक्ती हे आंदोलन भारताच्या स्वातंत्र्याचा शेवटचा टप्पा होता. गोवा कधी मुक्त झाला तर भारत देश १९४७ साली स्वतंत्र झाला त्यानंतर सुमारे १४ वर्षे लागली. ही मुक्ती होण्यास वास्तविक पाहता १९५० च्या सुमारास होणे आवश्यक होते. पण ती झाली नाही. १९५० पर्यंत काश्मीर, हैद्राबाद व जुनागढ हे भारतीय संघराज्यात सामील झाले होते पण गोवा सामील झाला नव्हता. वरील तीन संस्थाने ही संस्थांनी राज्ये होती तर गोवा हे परकीयांच्या ताब्यात होते. यासाठी १९४६ ते १९६१ पर्यंत भारतीय जनतेने अनेक आंदोलने केली या आंदोलनातील महाराष्ट्राने मोठा वाट उचलला होता. त्याबाबत अनेक लेखकांनी आप-आपल्या परीने या आंदोलनाचे मूल्यमापन केले केले परंतु महाराष्ट्राच्या योगदानावर अजूनही म्हणावे तसे लिखाण झाले नाही.

या शोधनिबंधाचे उद्देश गोवा मुक्ती आंदोलनाची माहिती देणे व या आंदोलनातील महाराष्ट्राचे योगदान सांगणे असे आहेत.

१५१० मध्ये गोवा, पोर्तुगीज सत्तेने ताब्यात घेतला तेव्हापासून ते १९६० पर्यंत त्यांचीच सत्ता होती. स्थानिक पातळीवर गोव्यातील राणे घराण्यातील काहींनी या सत्तेच्या विरोधात उठाव केले पण त्यात यश प्राप्त झाले नाही. १७७५ पासून ते १८८२ पर्यंत सुमारे १४ वेळा असे उठाव झाले पण पोर्तुगीज सत्तेने ते सर्व उठाव दडपून टाकले.[१] विसाव्या शतकातील बाह्य जगातील काही परिणाम गोव्यातील जनतेवर होऊ लागले. भारतीय प्रदेशात वसाहतवादाच्या विरोधात जी स्वातंत्र चळवळ

चालली होती त्याचे पडसाद गोव्यातील जनतेवर होत असलेले दिसतात.

१९२८ मध्ये गोव्यात नॅशनल कॉंग्रेस गोवा या राजकीय संघटनेची स्थापन ट्रीटो डी ब्रेगेन्झा यांनी मार्मागोवा येथे केली होती. याला अत्यंत गुप्तपणे डॉ. कुन्ह हे मार्गदर्शन करीत होते. ही संघटना म्हणजे भारतातील राष्ट्रीय कॉंग्रेसची एक शाखा म्हणून गोव्यातील लोक ओळखत होते. परंतु ही शखा १९३५ साली बंद केली. मुंबईमध्ये गोव्यातील अनेक नागरिक स्थायिक झालेलं होते त्यांनी नेतेजी सुभाषचंद्र बोस याच्या मार्गदर्शनाने १२ ऑक्टोबर १९३५ साली मुंबईमध्ये 'गोवा कॉंग्रेस कमिटी' स्थापन केली.[२]

मुंबई आणि पुण्यातील गोव्याच्या लोकांनी काही मंडळे स्थापन करून भारतात या लढ्याची पार्श्वभूमी तयार करायला सुरुवात केली होती. यामध्ये गोमंतक मंडळ पुणे, अमर हिंद मंडळ दादर, गोमंतक भारती इत्यादी मंडळे आघाडीवर होती. या मंडळांनी गांधी जयंती किंवा भारतीय स्वातंत्र दिन असे  अनेक कार्यक्रम सुरु केले होते. याला जी .डी. वर्तक, ना.ग.गोरे अशी मंडळी उपस्थित राहून मार्गदर्शन करीत होती.

गोव्यातील राजकीय प्रश्नाला वाचा फोडली ती समाजवादी नेते राममनोहर लोहियायांनी. १८ जून १९४६ साली त्यांनी भाषण बंदीचा कायदा मोडला म्हणू त्यांना पोर्तुगीज सत्तेने अटक करून काही काळातच भारतीय सीमेलगत सोडले. डॉ. लोहियांनी गोव्याच्या नागरिकांची सत्याग्रहाची चळवळ बेळगावमध्ये सुरु केली. यासाठी त्यांना काही स्वयंसेवकांची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी कोल्हापुरातील प्रजा परिषदेला पत्र पाठवून स्वयंसेवकांची मागणी केली होती.[३] लोहिया यांच्या सत्याग्रहाला गोवेकरांनी खूप मोठा प्रतिसाद दिला.

१९५५ साली महाराष्ट्रात दोन चळवळी जोमात सुरु होत्या त्या म्हणजे एक संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि दुसरी गोवा मुक्ती आंदोलनाची चळवळ. गोवामुक्ती आंदोलनाला पाठीबा देणे हे आपले एक राष्ट्रीय कर्तव्य आहे अशा मानसिकतेतून ३१ जुलै १९५४ साली सर्वपक्षीय लोकांची एक बैठक पुण्यातील केसरीच्या कार्यालयात भरली आणि देशभक्त केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली *'गोवा विमाचन सहाय्यक समिती'* स्थापना झाली.[४] ही समिती पुढे सर्व लढ्याचे नेतृत्व करीत राहिली.

या समितीच्या स्थापनेच्या दुसऱ्याच दिवशी जेष्ठ समाजवादी नेते एस .एम.जोशी यांनी पोर्तुगीज वाकालती समोर काळे झेंडे दाखवून निदर्शन केले होते[५]याचा परिणाम म्हणून गोव्यातील काही भागात लोकांनीही काही आंदोलने केली होती. बेळगावमधील काही राजकीय नेते आणि नॅशनल कॉंग्रेस गोवा यांनी १५ ऑगस्टला सत्याग्रहाची चळवळ सुरु करणार असल्याचे जाहीर केले.[६]

गोव्यातील पोर्तुगीज सरकारने याची गंभार दखल घेतलेली दिसते. गोव्यातील जनरलने जाहीर केले की, 'बळाचा वापर केला तर बळानेच उत्तर दिले जाईल'.[७]

जेष्ठ नेते सेनापती बापट आणि प्रा. मधू दंडवते यांनी भारत सरकारकडे गोव्यामध्ये पोलीस कारवाईची मागणी केली. परंतु पंडित नेहरूनी ती नाकारली. १५ ऑगस्टला झालेल्या सत्याग्रहीवर पोर्तुगीज सरकारने बेछुट गोळीबार केला. याचा राग येणे स्वाभाविक होते. यातून मुंबई मध्ये उग्र आंदोलने झाली. *'लाठी गोली खायेंगे फिर भी गोवा जायेंगे, सालझार मुर्दाबाद'* अशा घोषणा निदर्शकांनी दिल्या. यावेळी पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला.[८]

गोवा आंदोलन चालविण्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यासाठी 'गोवा विमाचन सहाय्यक समिती पुणे यांनी लोकांना आवाहन केले.[९] त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. ही मदत गोळा करण्यासाठी कार्यकर्ते रस्त्यावर फिरू लागले. यातून दोन गोष्टी होत होती एक म्हणजे मदत गोळा होत होती आणि दुसरे म्हणजे या आंदोलनाला लोकांचा पाठीबा मिळत होता. याकामी शाहीर अमर शेख व अण्णभाऊ साठे यांनी आपल्या शाहिरीचा वापर केला.[१०] लोकांनी किती मदत केली याचा लेखा जोखा दररोज दैनिक केसरी मधून प्रसिद्ध करण्यात येत होता. याची रक्कम निश्चित सांगता येत नाही पण आकडेवारी बरीच मोठी आहे.

आता पर्यंतचे सर्व सत्याग्रही हे गोव्यातील नागरिक होते पण महाराष्ट्रातील लोकांनी म्हणजे समितीने एक गोष्ट जाहीर करून टाकली ती म्हणजे *'आता भारतीय लोक सत्याग्रह करतील'* भारत सरकारने याला विरोध केला पण त्या विरोधाला न जुमानता महाराष्ट्रातून अनेक लोकांनी सत्याग्रह केले. यामध्ये पहिला सत्याग्रही होण्याचा मान ना.ग. गोरे आणि सेनापती बापट यांना मिळाला. या सत्याग्रही तुकडीला बेदम मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर मात्र महाराष्ट्राने कधीच मागे वळून पहिले नाही. शिरुभाऊ लिमये यांच्या तुकडीत ७० आत्माराम पाटील यांच्या तुकडीत ७१ राजाराम पाटील यांच्या तुकडीत ७५ व्ही.जी देशपांडे यांच्या तुकडीत १२७ जगनाथ जोशी व अंगडी यांच्या तुकडीत १४७ मधू लिमये यांच्या तुकडीत ८४ भाई नांदेडकर यांच्या तुकडीत ११६ मधू दंडवते यांच्या तुकडीत ८२ असे सत्याग्रही सामील होऊन गोवा हद्दीत सत्याग्रह करीत होते. यांना बेदम मारहाण होत होती इतकेच नव्हे तर गोळीबारही होत होता. यामध्ये अनेक लोकांनी आपले प्राण खर्ची घातले.

१५ ऑगस्ट १९५५ च्या दिवशी मोठ्या प्रमाणात सत्याग्रह करण्याची घोषणा *'गोवा विमाचन सहाय्यक समिती* पुणे यांनी केली होती. त्यानुसार सहा भागातून सत्याग्राहीच्या तुकड्या गोव्यात शिरण्याचे नियोजन केले होते. किर्पानी खेड्यातून ३९ सत्याग्रही नेतृत्व राजस्थानचे स्वामी दास, तेरेखोल मधून १२७ सत्याग्रही नेतृत्व कुलाबाचे हिरवे गुरुजी, बांदा मधून ६४२ सत्याग्रही नेतृत्व कॉम्रेड चितळे, दोडामार्ग मधून पुण्यातील काही विद्यार्थी, आरोंदा मधून साताऱ्याचे केशवराव पाटील, अशी सत्याग्रहीची निवड झाली. झालेल्या सत्याग्रहात किर्पानीमध्ये पन्नालाल जैन, बांदा मध्ये सहोदर राय, तेरेखोल मध्ये हिरवे गुरुजी, कॅसाल

रॉकमध्ये बापू हॉटेलवाला आणि रामन हे लोक गोळीबारात शहीद झाले.

सत्याग्रहाबरोबर सशस्त्र लढा देणारी एक संघटन होती आणि ती म्हणजे आझाद गोमंतक दल. ॲड विश्वनाथ लवंदे हे त्याचे प्रमुख होते. यामध्ये मोहन रानडे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, इत्यादी मंडळी यामध्ये काम करीत होती. मोहन रानडे यांना अटक होऊन बरीच वर्षे पोर्तुगीज तुरुंगात काढावे लागले होते. गोवा १९६१ साली स्वतंत्र झाला पण रानडे मात्र मुक्त झाले ते १९६९ मध्ये.[११]

१९ डिसेंबर १९६१ साली भारत सरकारने ऑपरेशन विजय ही मोहीम राबवली आणि गोवा मुक्त झाला.

**निष्कर्ष:**

गोवा हा भारताचा अविभाज्य भाग असल्याने तो मुक्त करण्यासाठी जी जनतेची लढाई सुरु करावी लागली त्यामध्ये महाराष्ट्राने आपली भूमिका चोख बजावली. गोवा हा महाराष्ट्राच्या भूमीचा एक भाग आहे असा ही एक सूर या चळवळीत होता. *‘गोवेकरानो तुम्ही आमचच असा’* या मथळ्याखालील आचार्य अत्रे यांचा लेख अनेक गोष्टी सांगून जातो. जरी गोवा हा कोकणी भाषिक असला तरी त्याची लिपी मात्र देवनागरी आहे असाही एक दावा केले गेला होता. त्यामुळे गोवामुक्तीसाठी लढा का महाराष्ट्रात सामील करून घेण्यासाठी लढा? असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. पण याला आणखी एक बाजू आहे ती म्हणजे तो मुक्त झाल्यावर कुठे सामील करायायचा हा तेथील जनतेचा प्रश्न होता. झाला नाही हा भाग वेगळा पण तो कैक वर्षे पोर्तुगीज सत्तेखाली होता तेथील लोकांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व धर्मिक हक्कावर गदा आली होती त्यातून ते लोक मुक्त झाले आणि लोकशाहीवादी राज्य निर्माण झाले. अशा लोकशाहीवादी राज्याची पोर्तुगीज तावडीतून सुटका करून घेण्यासाठी जी चळवळ झाली त्यामध्ये महाराष्ट्राने आपले मोलाचे योगदान दिले आहे.

वास्तविक हि चळवळ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी वेळीच सुरु होती. त्यामुळे जनतेच्या प्रचंड साथीने या चळवळीने जोर धरला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात विरोधी भूमिका घेणारे तत्कालीन मुख्यमंत्री श्री मोरारजीभाई देसाई आणि या देखील लढ्यात चळवळीला विरोध करणारे देखील तेच होते. तरीही महाराष्ट्राच्या भूमीवरून चाललेला हा लढा थांबला नाही. नेतृत्व आणि त्यांनी दिलेल्या दिशा हे जसे लढ्यास यशस्वी करण्यास कारणीभूत होते तसे जनतेच्या मनातील स्वातंत्र्याचा भावना देखील कारणीभूत होत्या. शाहीर आत्माराम पाटील यांनी आपल्या शाहिरी मधून मांडलेला मंत्र जणू जनतेने मानत ठसवून ठेवलेला होता. शाहीर आत्माराम पाटील यांनी म्हंटले होते,

*‘स्वातंत्र्याच्या भाजी भाकरीत सापडती रे अजून खडे*
*, उचला पोर्तुगीज अण चला पुढे’*

स्फुरण देणारी भूमिका या लढ्य नेहमीच पुढे आलेली दिसते..

गोवा महाराष्ट्रात विलीन करून घ्यावा का यावर सार्वमत हे गोवेकरांच्या बाजूने गेले असले

तरी महाराष्ट्राने जे आपले योगदान दिले आहे ते मात्र लढ्याच्या इतिहासात अजरामर झालेले आहे.

**संदर्भ:**


१. शिरोडकर पी.पी. गोवा फ्रीडम मुव्हमेंट, अजंठा पब्लिकेशन न्यू दिल्ली, १९८८, पृ क्र २७

२. कुंटे बी.जी.(संपा)सोर्स मटेरियल इन गोवा फ्रीडम मुव्हमेंट, खंड क्र २ पृ क्र ३१

३. उपरोक्त पृ.क्र ८६

४. दैनिक केसरी,पुणे,१ ऑगस्ट १९५४, पृ क्र ३

५. दैनिक नवशक्ती,मुंबई, २ ऑगस्ट १९५४, पृ क्र,१

६. उपरोक्त, १ ऑगस्ट १९५४, पृ क्र,१

७. टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई, १२ ऑगस्ट,१९५४ पृ,क्र,१

८. दैनिक नवशक्ती,मुंबई, १७ ऑगस्ट १९५५, पृ क्र,१

९. दैनिक केसरी,पुणे,२१ मे १९५५,पृ क्र ३

१०. दैनिक नवशक्ती,मुंबई, ९ ऑगस्ट १९५५, पृ क्र,१

११. मोहन रानडे, सतीचे वाण, परम मित्र पब्लिकेशन, पुणे १९८५, पृ क्र,५४